महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व,
मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७.
ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा
MHADA

===========================================================================

जावक क्रमांक – ८२३/९९ दिनांक :- ०५ ऑगस्ट, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे १३२३ निवासी सदनिका व १८ भूखंडांच्या सोडतीद्वारे विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेला ३१ ऑगस्टपर्यंत

मुंबई, दि. ०५ ऑगस्ट, २०२५ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचा (म्हाडा) विभागीय घटक छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या अखत्यारीतील छत्रपती संभाजीनगर शहर-जिल्हा, बीड मधील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत १ हजार ३२३ निवासी सदनिका व १८ भूखंडांच्या ऑनलाइन संगणकीय सोडतीद्वारे विक्रीकरिता https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी आणि अर्ज भरणा प्रक्रियेला ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. दत्तात्रय नवले यांनी दिली.

छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे जाहीर सोडत तीन घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत १ हजार १४८ सदनिका, म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत १५४ सदनिका, २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत २१ सदनिका व १८ भूखंडांचा समावेश आहे.

छत्रपती संभाजी नगर मंडळाच्या संगणकीय सोडतीसाठी एकात्मिक गृहनिर्माण सोडत व्यवस्थापन प्रणाली म्हणजेच Integrated Housing Lottery Management System (IHLMS 2.0) या नूतन संगणकीय प्रणाली व ऍपवर सदनिकांच्या अर्ज नोंदणी व अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते दि. ३० जून २०२५ रोजी प्रारंभ करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर मंडळाने जाहीर केलेल्या सदनिका विक्री सोडतीत सहभाग घेण्याकरिता दि. ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहे. दि. ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११. ५९ वाजेपर्यंत अर्जदार अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील. दि. ०१ सप्टेंबर, २०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS/NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. अशाप्रकारे सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदारच या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील. सोडतीसाठी पात्र अर्जांची प्रारूप यादी दिनांक दि. ०८ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता 'म्हाडा'च्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक १६ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता अंतिम पात्र अर्जांची यादी जाहीर केली जाणार आहे. दि. २६ सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे संगणकीय सोडतीचा कार्यक्रम होणार आहे.

मंडळाने पूर्वी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीतील व माहिती पुस्तिकेतील काही अटी व शर्तींमध्ये मंडळातर्फे बदल/दुरूस्ती केली असून मंडळाने उत्पन्नाचा पुरावा आर्थिक वर्ष दि. ०१.०४.२०२४ ते दि. ३१.०३.२०२५ या कालावधीतील घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. ज्या अर्जदारांनी यापूर्वी म्हणजेच सदर निवेदन प्रसिध्द होण्यापुर्वी आर्थिक वर्ष २०२३-२०२४ चे उत्पन्न प्रमाणपत्र तसेच आयकर विवरणपत्र सादर करून अनामत रकमेचा भरणा केलेला आहे त्या अर्जदारांनी विहित वेळेत आर्थिक वर्ष २०२४-२०२५ या कालावधीतील उत्पन्नाचा पुरावा सादर करावा.

संकेत क्र. २५९, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) १ हजार ५६ सदनिका, अत्यल्प उत्पन्न गट, नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर या योजनेतील सामाजिक आरक्षण (SC,ST,NT,VJ) वगळता इतर समांतर आरक्षण रद्द

करण्यात येत आहे. या आरक्षणासाठी राखीव सदनिका सर्वसाधारण प्रवर्गात वर्ग करण्यात येत आहे. त्यामुळे सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव सदनिकांची संख्या एकुण ८४५ असणार आहे. तसेच ज्या अर्जदारांनी यापुर्वी सामाजिक आरक्षण वगळता इतर आरक्षणात अर्ज केलेला असेल त्यांचे अर्ज सर्वसाधारण प्रवर्गात वर्ग करण्यात येत आहे.

जाहिरातीत संकेत क्र. २६१, ३९० सदनिका चिकलठाणा या योजनेतील सदनिकेची संख्या १५८ अशी नमुद करण्यात आलेली आहे. यामध्ये बदल करण्यात येत असून या योजनेतील सदनिकेची संख्या सुधारित झालेली असून ती १४८ सदनिका अशी आहे

प्रधानमंत्री आवास योजनेसाठी जे अर्जदार अर्ज सादर करीत आहे त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचे नोंदणी संबंधित प्रमाणपत्र सादर करावे लागत होते. यामध्ये बदल करण्यात आलेला असून अर्जदारांना प्रधानमंत्री आवास योजनेसाठी अर्ज सादर करतेवेळी नोंदणी संबंधित प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही. परंतु अर्जदार सोडतीत यशस्वी झाल्यास त्यास देकारपत्र निर्गमित करण्यापुर्वी नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल, विहित मुदतीत सादर न केल्यास अर्जदाराचा अर्ज रद्द करण्यात येईल.

जाहिरातीतील व माहिती पुस्तिकेतील या व्यतिरीक्त इतर कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल करण्यात आलेल्या नाही. इतर सर्व अटी बंधनकारक असतील याची अर्जदारांनी नोंद घेण्याचे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. नवले यांनी सोडतीत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना आवाहन केले आहे की, नूतन संगणकीय सोडत प्रणाली ही संपूर्णतः ऑनलाईन व पारदर्शक असून कोणत्याही प्रकारे मानवी हस्तक्षेपास वाव नाही. शिवाय या सदनिकांच्या विक्रीकरिता मंडळाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट नेमलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने कोणत्याही त्रयस्थ /दलाल/ मध्यस्थ व्यक्तीच्या प्रलोभनांना बळी पडू नये. तसेच अशा प्रकारच्या गैरव्यवहारास अथवा फसवणुकीस मंडळ अथवा म्हाडा जबाबदार राहणार नाही. हक्काचे घर घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना ही सुवर्णसंधी असून अधिकाधिक नागरिकांनी या सोडतीत सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री. नवले यांनी केले आहे.

###

स्वाक्षरीत/-
(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

Maharashtra Housing & Area Development Authority
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 823/99 Dt. 5th August, 2025

**Press Release**

# MHADA's Chhatrapati Sambhajinagar Board grants extension for the lottery

Online application submission for the sale of 1,323 residential tenements and 18 plots extended till August 31, 2025

Mumbai, August 5, 2025: The Chhatrapati Sambhajinagar Board, a regional unit of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA), has extended the deadline for online registration and application submission until August 31, 2025 for the sale of 1,323 residential tenements and 18 plots under various housing schemes in the Chhatrapati Sambhajinagar city-district and Beed, through a computerized lottery until August 31, 2025.

Mr. Dattatraya Navale, Chief Officer of the Board , has informed that aspiring applicants can participate in the online lottery procedure from MHADA's official Wensite https://housing.mhada.gov.in until August 31, 2025. The dates have been extended for the convenience of the applicants he added.

The lottery announced by the Chhatrapati Sambhajinagar Board has been divided into three components. These include 1,148 tenements under the Pradhan Mantri Awas Yojana (Urban), 154 tenements under the MHADA Housing Scheme, and 21 tenements and 18 plots under the 20% Inclusive Housing Scheme.

The registration and application submission for the computerized lottery of the Board began on June 30, 2025, via its Integrated Housing Lottery Management System (IHLMS 2.0) and its mobile application. The last date for application submission is till 31/08/2025 till 11:59 PM. While the earnest money deposit can be paid online till 11:59 PM on 31/08/2025. Additionally, applicants opting to pay the EMD via RTGS/NEFT through their respective banks may do so during banking hours on September 1, 2025.

Only those applicants who complete all required documentation and payment formalities within the specified deadlines will be considered eligible for the computerized lottery draw, scheduled to be held on September 26, 2025, at the District Planning Committee Hall, Collector Office, Chhatrapati Sambhajinagar.

The provisional list of eligible applicants will be published on September 8, 2025, at 3:00 PM, and the final list will be made available on MHADA’s official website on September 26, 2025.

The Board has announced that proof of income for the financial year April 1, 2024 to March 31, 2025 will be considered for eligibility in the current lottery process. Applicants who had previously submitted income certificates or income tax returns for the financial year 2023–24 and paid the earnest money deposit (EMD) prior to this notice are now required to submit updated income documents for the financial year 2024–25 within the prescribed deadline.

In Scheme Code 259 under PMAY (Urban), which includes 1,056 tenements in Nakshatrawadi, Chhatrapati Sambhajinagar, the parallel reservation categories (except for SC, ST, NT, and VJ) have been cancelled. Consequently, these tenements have now been merged into the general category, increasing the number of tenements available under this category to 845. Applications already

received under the now-cancelled reservation categories (excluding statutory social reservations) will be automatically transferred to the general category.

In Scheme Code 261, related to 390 tenements at Chikalthana, the previously stated number of 158 tenements has been revised to 148.

Earlier, applicants under the PMAY scheme were required to submit a registration-related certificate at the time of application. This requirement has now been waived at the initial application stage. However, if selected in the lottery, applicants must mandatorily submit the registration certificate before the issuance of the allotment letter. Failure to do so within the stipulated timeframe will result in cancellation of the allotment.

Except for the changes mentioned above, all other terms and conditions stated in the original advertisement and information booklet remain unchanged and continue to be applicable. Applicants are requested to take due note of these updates.

Chief Officer Mr. Dattatraya Navale has urged interested applicants to note that the new computerized lottery system is entirely online, fully automated, and transparent, leaving no room for human intervention. The Board has not appointed any agents, consultants, or property dealers for the sale of these tenements. Applicants are strongly advised not to engage with any third-party brokers, agents, or intermediaries, as MHADA or the Board will not be responsible for any fraudulent transactions.

Mr. Navale emphasized that this is a golden opportunity for aspiring homeowners and encouraged maximum public participation in the lottery process.

###

Sd/-
(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA